# प्रकरण ६ भारताचे स्वातंत्र्योत्तर सशस्त्र संघर्ष

भारताला स्वातंत्र्योत्तर काळात शेजारी देशांशी अनेक युद्धे लढावी लागली. त्यातील चार पाकिस्तानच्या विरुद्ध, एक चीनच्या विरुद्ध आणि एक पंधराव्या शतकापासून पोर्तुगीजांच्या अमलाखाली असलेल्या गोव्याला मुक्त करण्यासाठी होते. या सगळ्या युद्धांमुळे भारताच्या राजकारणावर आणि वित्तीय व्यवस्थेवर अत्यंत गंभीर परिणाम झाले. परंतु, या युद्धांमुळे भारत अधिक सक्षमही झाला. सामरिक शास्त्राचे विद्यार्थी या नात्याने तुम्हांला या युद्धांचा आढावा घेणे गरजेचे आहे. भारताला खाली दिलेली युद्धे लढावी लागली होती :

१. भारत – पाकिस्तान युद्ध १९४७–४८

२. जुनागड मुक्ती संग्राम – ऑक्टोबर १९४७

३. हैद्राबाद मुक्ती संग्राम – सप्टेंबर १९४८

४. गोवा दीव–दमण मुक्ती संग्राम – डिसेंबर १९६१

५. भारत – चीन युद्ध १९६२

६. भारत – पाकिस्तान युद्ध – १९६५

७. भारत – पाकिस्तान युद्ध – १९७१

८. पाकिस्तानविरुद्ध कारगिल संग्राम – १९९९

२२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तानने काश्मीरमध्ये छापे मारून प्रदेश काबीज करण्यासाठी घुसखोर पाठवले (त्यात प्रामुख्याने अफगाणिस्तानातील ड्युरंड रेषेच्या आसपासचे टोळीवाले होते), आणि त्यांची पाठराखण करायला पाकिस्तानच्या लष्करातील काही सैन्य होते. या टोळ्या सुरुवातीला पाकिस्तानच्या अबोटाबाद आणि मुझफ्फराबादमधून काश्मीरच्या पूंछ आणि राजौरी भागात आणि नंतर उत्तरेकडे गिलगिट व हुंझा भागातून घुसल्या. काही दिवसातच पाकिस्तानी सैन्याने जम्मू–काश्मीरच्या सीमेवर चौफेर हल्ले चढवले. महाराज हरिसिंगांच्या डोगरा फौजेने या हल्ल्यांचा प्रखरतेने सामना केला. परंतु ही डोगरा फौज संख्येने अपुरी पडली. २४ ऑक्टोबरला जेव्हा हे घुसखोर श्रीनगरच्या जवळ पोहोचले तेव्हा महाराज हरिसिंगांनी भारताकडे मदत मागितली. भारताने या मागणीचा विचार केला, परंतु, काश्मीर हे स्वतंत्र राज्य म्हणून घोषित झाले असल्यामुळे जोपर्यंत काश्मीर भारताचा अविभाज्य भाग म्हणून विलीन होत नाही तोपर्यंत ही मदत देण्यास नकार दिला. कारण भारत इतर राज्यांच्या या पेचात हस्तक्षेप करू इच्छित नव्हते. जर काश्मीर राज्य भारतात विलीन झाले तरच भारत मदत




भारत – पाकिस्तान युद्ध १९४७ – ४८

करू शकेल या भारताच्या भूमिकेमुळे, अखेरीस, जम्मू-काश्मीर संस्थान २७ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात विलीन झाले (या विलीनीकरणाच्या दस्ताऐवजाला "इंस्ट्रूमेंट ऑफ ॲक्सेशन" असे म्हणतात).

या दस्तऐवजावर स्वाक्षरी झाल्यावर काश्मीर भारताचा एक घटक झाले आणि भारताने आपली पहिली सैनिकी तुकडी डकोटा विमानांनी श्रीनगरला उतरवली आणि पाठोपाठ आणखी तुकड्या घुसखोरांना प्रत्युत्तर देण्यासाठी हवाई तसेच भूमार्गाने पाठवल्या. हळूहळू, शर्थीच्या चकमकी लढत, घुसखोरांना पीर-पंजाल पर्वतरांगांच्या आणि उत्तर काश्मीरमध्ये 'झोजी-ला' च्या (ला म्हणजे खिंड) पलीकडे रेटण्यात भारतीय लष्कराला यश मिळाले. त्याचबरोबर भारताने संयुक्त राष्ट्रांकडे या संघर्षात मध्यस्थी करण्याची मागणी केली. संथ गतीने चालणारा हा संघर्ष १९४८च्या वर्षात तसाच चालू राहिला आणि भारतीय सैन्य घुसखोरांना मागे मागे रेटतच राहिले.

१ जानेवारी १९४९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने युद्धबंदी करण्यात आली आणि त्यानंतर कराची येथे करार करण्यात आला. त्या करारानुसार दोन्ही देशांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या भूप्रदेशाला स्पर्श करणारी रेषा ही 'युद्धबंदीरेषा' मानण्यात आली. या युद्धबंदीबरोबरच भारताचे स्वातंत्र्योत्तर पहिले युद्ध संपुष्टात आले. पण, या युद्धानंतर मूळ काश्मीरचा ५३% भाग पाकिस्तानच्या ताब्यात राहिला आणि उरलेला ४७% प्रदेश भारताच्या ताब्यात राहिला.

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

भारत आणि पाकिस्तानातील संयुक्त राष्ट्रांचा सैनिक परिवेक्षण समूह (UNMOGIP)काय आहे? हा समूह काय भूमिका निभावतो ?

## जुनागड मुक्ती संग्राम : ऑक्टोबर १९४७




जुनागड

जुनागड हे सौराष्ट्र भागातील (आजच्या गुजरात राज्यात) एक संस्थान होते. नवाब मुहंमद महाबत खान तिसरा हा जुनागडचा राजा होता आणि त्या संस्थानात प्रजा बहुसंख्य हिंदू होती. या संस्थानात एक सीमा अरबी समुद्रालगत तर इतर सीमा नवनिर्मित भारताशी जोडलेल्या होत्या. आपले राज्य पाकिस्तानात सामील करून घ्यावे अशी नवाबाची इच्छा होती.

जुनागडच्या सैन्याने शेजारील मंगरोल आणि बाबारियावाड या राज्यात घुसखोरी आणि हिंसाचार सुरू केला. जुनागडच्या हिंदू प्रजेने नवाबाच्या विरोधात उठाव सुरू केला. या माहितीच्या आधारे भारत सरकारने त्वरेने जुनागड मुक्त करण्यासाठी सैनिकांची जमवाजमव करण्याचे ठरवले. पायदलाची एक ब्रिगेड राजकोट येथे एकत्र केली गेली, जाफ्राबादमध्ये (काठियावाड भागात) भू-जल कारवाईसाठी नौसेनेची एक तुकडी जमवण्याचे हुकूम देण्यात आले. तसेच जामनगर येथे हवाईदलाचे एक स्क्वॉड्रन तातडीच्या प्रतिक्रियेसाठी सज्ज ठेवण्यात आले. तिन्ही दलांच्या एकत्रित कारवाईचे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे हे पहिले उदाहरण होते.

एवढ्या मोठ्या संख्येने सैन्य जमा होत असलेले पाहून जुनागडचा नवाब पाकिस्तानात निघून गेला. ऑक्टोबरच्या अखेरीस भारतीय सैन्य जुनागडमध्ये शिरले. हवाईदलाने जुनागडवरून विमानांची उड्डाणे केली आणि नौदलाच्या तुकड्या जाफ्राबादेत उतरल्या. त्यानंतर जुनागडमध्ये जनमत घेण्यात आले त्यामते ९१% लोकांनी भारतात विलीनीकरणाची इच्छा व्यक्त केली.

## हैद्राबाद मुक्तिसंग्राम: सप्टेंबर १९४८




हैद्राबाद

जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा हैद्राबादच्या निझामाने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. पण, भारताच्या भूभागाने वेढलेले हैद्राबादचे स्वतंत्र राष्ट्र भविष्यात भूराजकीय प्रश्न निर्माण करू शकले असते. जुलै १९४८ पर्यंत भारतीय फौजा आणि निझामाचे रझाकार यांच्यातल्या सीमेवरील चकमकी वाढल्या होत्या. पाकिस्तानने वरंगळ आणि बिदर या हैद्राबादमधील विमानतळांवर हवाईमार्गे बंदुका उतरवल्या.


भारताने लष्करी कारवाई केली, तिचे सांकेतिक नाव 'ऑपरेशन पोलो' असे ठेवले होते. ही मोहीम १२ सप्टेंबर १९४८ रोजी सुरू करण्यात आली. भारतीय सैन्याने पाच ठिकाणी आघाडी उघडली. सोलापूर – हैद्राबाद या दिशेची मोहिम ही सगळ्यांत महत्त्वाची होती. कारण तो सर्वांत कमी लांबीचा मार्ग होता. भारतीय हवाईदलाने बिदर आणि वरंगळ या हवाईतळांवर हल्ला केला आणि आपल्या पायदळाला परिणामकारक पाठिंबा दिला. भारतीय सैन्याने हैद्राबादच्या सैन्याचा आणि रझाकारांचा विरोध मोडून काढत हैद्राबाद काबीज केले. निझामाने १७ सप्टेंबर १९४८ रोजी शरणागती पत्करली.

## गोवा, दमण व दीव मुक्ती संग्राम : डिसेंबर १९६१

भारतामध्ये गोवा, दीव आणि दमण येथे पोर्तुगीजांचे राज्य होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतरदेखील पोर्तुगीजांनी या प्रदेशावरील हक्क सोडला नाही. या प्रदेशाला पोर्तुगीजांपासून मुक्त करणे हा भारताच्या वसाहतवादविरोधी धोरणाचा एक भाग होता.

भारताने पायदळाची एक डिव्हिजन सैन्य, रणगाडे व तोफखाना; तसेच हवाई दलाची लढाऊ व बॉम्बफेकी विमाने यांच्या साहाय्याने पोर्तुगीजांच्या ताब्यातील गोव्यावर हल्ला करण्याचे योजले. भारतीय नौसेनेला गोव्याच्या तीन बंदरांची नाकेबंदी करण्याचे काम सोपवण्यात आले. ज्यायोगे या बंदरांत इतर युद्धनौका येऊ नयेत. याबरोबर, पायदळाच्या दोन बटालियन आणि जामनगरच्या तळावरून हवाई दलाच्या साहाय्याने आणि नौदलाच्या साहाय्याने दीवच्या किनारपट्टीवरील किल्ला आणि तिथले प्रदेश काबीज करण्याची योजना केली. या मोहिमेची सुरुवात १८ डिसेंबर १९६१ रोजी झाली.

पोर्तुगीजांनी १९ डिसेंबर १९६१ रोजी शरणागती पत्करली आणि लढाई संपली. या लढाईत सुमारे ३००० पोर्तुगीज सैनिक कैद झाले.




दीव




दमण





गोवा

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

पोर्तुगीजांसाठी गोव्याचे महत्त्व काय होते ?

## भारत – चीन युद्ध : १९६२






लडाख

१९४९ साली चीनच्या साम्यवादी सरकारला प्रथम मान्यता देण्याऱ्यांमध्ये भारत हा एक देश होता. १९५५ च्या बांडुंग परिषदेत चीनचा सहभाग होता. असे असूनदेखील या दोन देशांमधील संबंध बिघडत गेले. १९५८ मध्ये अक्साई चीन परिसरात चकमकी झाल्या होत्या. पुढे १९६२ साली या दोन्ही देशांमध्ये युद्ध झाले.

भारत आणि चीनदरम्यानच्या तणावांची मुख्य कारणे खालीलप्रमाणे– १९५० साली चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने तिबेटवर बळजबरीने ताबा मिळवला.

- चीनने मॅकमहॉन सीमारेषा अमान्य केली आणि संपूर्ण अरूणाचल प्रदेशावर (पूर्वीचे NEFA परिसरात) आपले सार्वभौमत्व असल्याचा दावा केला.
- १९५६ मध्ये लडाख येथील अक्साई चीन प्रदेशात घुसखोरी करून त्या प्रदेशावर ताबा मिळवला.
- १९५९ साली चौदावे दलाई लामा आणि अनेक तिबेटी निर्वासित भारतात आले. भारत सरकारने दलाई लामा यांना आश्रय दिला.
- अलिप्ततावादी धोरणाच्या आधारे भारताचे आफ्रो–आशियायी देशांमधील वाढते महत्त्वही चीनला सलत होते.

२० ऑक्टोबर १९६२ साली चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने लडाख आणि अरुणाचल प्रदेश (त्यावेळचा नेफा) यावर एकाच वेळी हल्ला केला. हे युद्ध २१ नोव्हेंबर १९६२पर्यंत चालले. या युद्धात भारताचा पराभव झाला. नंतर अरुणाचल प्रदेशामधून चीनने आपणहून माघार घेतली. हिमवृष्टी होऊन खिंड बंद होण्याआधी ही माघार घेतली होती. लडाखमधील अक्साई चीन परिसरातून मात्र चीनच्या सैन्याने माघार घेतली नाही.

**भारताच्या पराभवाची कारणे :**

(i) भारताच्या राजकीय नेतृत्वाला चीनच्या उद्देशांबाबत अंदाज बांधता आला नाही. याबाबत भारताच्या लष्करी सल्लागारांनी आपण योग्य तयारी करण्याची गरज आहे याची पूर्वसूचना दिली होती.

(ii) चीनने भारताविरुद्ध मर्यादित युद्ध करण्याच्या दृष्टीने लागणारे सैनिकी बळ व साधनसामुग्री यांची योग्य तयारी केली होती.

(iii) भारतीय सैन्य जेव्हा युद्धात उतरले तेव्हा अनेक गोष्टींची कमतरता होती. त्यात योग्य रस्ते, पुरवठा योजनेचा अभाव, डोंगराळ प्रदेशात युद्धासाठीच्या योग्य शस्त्रांचा अभाव आणि अतिउंच प्रदेशात लढण्यासाठी लागणाऱ्या या साधनसामग्रीचा अभाव होता.

(iv) भारतीय हवाईदलाचा योग्य वापर केला गेला नाही.




**भारत – चीन युद्ध : १९६२**

## भारत – पाकिस्तान युद्ध : १९६५




**कच्छचे रण**




भारत-पाकिस्तान सीमा (काश्मीर)

१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाची कारणे जम्मू-काश्मीरबाबतच्या पाकिस्तानच्या दृष्टिकोनात शोधता येतात. १९४७ साली जम्मू काश्मीरच्या महाराजांनी भारतात सामील होण्याचा जो निर्णय घेतला तो पाकिस्तानला मान्य नव्हता. त्याचा परिणाम म्हणजे १९४७-४८ चे पहिले भारत-पाकिस्तान युद्ध होय. १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्धाची कारणे काय होती? ती जाणून घेऊया.

१९६२ च्या भारत चीन युद्धामध्ये भारताचा जो पराभव झाला होता त्यामुळे भारताच्या लष्करी सामर्थ्यावर, तसेच नीतीधैर्यावर होणाऱ्या या परिणामांबद्दल पाकिस्तानने केलेला अंदाज योग्य नव्हता. तसेच जम्मू-काश्मीरच्या जनतेच्या विचारांबाबतही त्यांचे अंदाज चुकले होते. भारतीय लष्कराचे मनोधैर्य आणि नेतृत्व यांची चाचपणी करण्यासाठी पाकिस्तानने कच्छच्या रणात एप्रिल १९६५ मध्ये एक छोटी मोहीम आखली. ती यशस्वी झाली नाही. त्यानंतर 'ऑपरेशन जिब्राल्टर' नावाने १९४७च्या प्रमाणे पाकिस्तानने जम्मू काश्मीरमध्ये मोहीम आखली. ५ ऑगस्ट १९६५ मध्ये सुमारे ३००० पाकिस्तानी सैनिक स्थानिक काश्मीरी जनतेच्या वेषात प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून काश्मीरमध्ये घुसले. काश्मीरी नागरिकांनी या घुसखोरीची माहिती तातडीने दिली. भारतीय लष्कराने घुसखोरांना अडवून त्यांचा पराभव केला. १ सप्टेंबर १९६५ रोजी ऑपरेशन ग्रँड स्लॅम नावाने पाकिस्तानने छांब-जौरीयन क्षेत्रातील जम्मू-श्रीनगर रस्ता अडवण्याच्या दृष्टीने कारवाई सुरू केली. पाकिस्तानच्या या आक्रमणाच्या विरोधात भारतीय हवाई दलाने प्रतिकार करून त्याला थोपवण्यात यश मिळवले. त्यानंतर सियालकोट व लाहोर क्षेत्रात भारताने प्रतिहल्ला चढवला. या प्रतिहल्ल्यात धोक्याची जाणीव होऊन पाकिस्तानने छांब क्षेत्रातून चिलखती तुकड्या काढून सियालकोट व लाहोर परिसरात तैनात करण्यास सुरुवात केली. भारतीय सैन्याने पूर्व लाहोरमधील इचोगिल कालव्यावर लक्ष केंद्रित केले व सियालकोट क्षेत्रात घनघोर युद्ध झाले.

दरम्यानच्या काळात पाकिस्तानने लाहोरच्या दक्षिणेस आपले रणगाडा दल एकत्रित केले आणि ९ ते ११ सप्टेंबर १९६५ च्या दरम्यान खेमकरण क्षेत्रात प्रतिहल्ला सुरू केला. भारतीय सेनेने त्या भागात कालवे फोडून दलदल निर्माण केली आणि असल उत्तर या

गावात पाकिस्तानी रणगाड्यांना अडवले. पाकिस्तानचे अनेक पॅटन रणगाडे तेथे उद्ध्वस्त करण्यात आले. २३ सप्टेंबर १९६५ रोजी युद्धबंदी जाहीर होईपर्यंत सर्व क्षेत्रात युद्ध झाले. १९६६ मध्ये ताश्कंद येथे शांतता परिषद झाली. दोन्ही बाजूंनी ताब्यात घेतलेल्या प्रदेशातून सैन्य माघार घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

या युद्धामुळे १९६२ च्या युद्धात भारतीय सेनेने गमवलेला आत्मविश्वास पुन्हा परत मिळवला. या युद्धात भारताची शस्त्रास्त्रे ही पाकिस्तानला अमेरिकेने दिलेल्या शस्त्रास्त्रांपेक्षा जुनी होती. दुसऱ्या महायुद्ध काळातील शेअरमन रणगाडे व व्हॅंपायर आणि हंटर विमाने होती तर पाकिस्तानकडे पॅटन रणगाडे व F 86 सेबरजेट आणि F 104 स्टार फायटर्स ही आधुनिक विमाने होती. या युद्धानंतर भारतीय लष्कराचे आधुनिकीकरण करण्यास सुरुवात करण्यात आली. त्याचा फायदा भारताला १९७१ च्या युद्धात झाला.



भारत – पाकिस्तान युद्ध: १९६५

## भारत –पाकिस्तान युद्ध : १९७१

पाकिस्तानात १९७०मध्ये संसदेच्या सार्वजनिक निवडणुका झाल्या. शेख मुजीबूर रहमान यांच्या नेतृत्वाखाली पूर्व–पाकिस्तानस्थित अवामी लीग या पार्टीला बहुमत मिळाले. परंतु, पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष याह्या खान यांनी शेख मुजीबूर रहमान यांना सरकारस्थापनेपासून दूर ठेवले. त्यामुळे पूर्व पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू झाली. याह्या खान यांनी निदर्शकांवर कारवाईचा बडगा उगारला (याला 'ऑपरेशन सर्चलाईट' म्हणतात). अवामी लीगचे प्रमुख मुजीबूर रहमान यांनी स्वातंत्र्याची मागणी केली. पाकिस्तानी सैन्याने लोकांचा संहार करण्यास सुरुवात केली आणि पूर्व पाकिस्तानातून लाखोंच्या संख्येने निराश्रित लोक भारतामध्ये येऊ लागले. संयुक्त राष्ट्राने मध्यस्थी करून हा संहार थांबवावा या भारताच्या विनंतीचा काही परिणाम झाला नाही. भारतीय लष्कर आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात चकमकी सुरू झाल्या.

भारताने शेख मुजीबूर यांच्या अवामी लीगला आणि मुक्ती वाहिनीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा दिला. पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ रोजी भारताच्या पश्चिम विभागातील आठ विमान तळांवर




हवाई हल्ले करून लढाईची सुरुवात केली. हे हवाई हल्ले परिणामकारी नव्हते. पण त्यामुळे भारताने पाकिस्तानविरुद्ध युद्ध पुकारले.


ही लढाई दोन आघाड्यांवर लढली गेली– पश्चिम आघाडी आणि पूर्व पाकिस्तान आघाडी. भारतीय सैन्याने मुक्ती वाहिनीच्या मदतीने पूर्व पाकिस्तानात चारही बाजूंनी चढाई केली. भारतीय भूदल, हवाईदल आणि नौदल यांच्यात उत्तम समन्वय साधला गेला. नौदलाने पूर्व पाकिस्तानच्या चितगाँव, खुलना आणि कोक्सबझार या महत्वाच्या बंदरांची नाकेबंदी केली. हवाईदलाने पूर्व पाकिस्तानवर हवाई वर्चस्व निर्माण केले. पायदळाने ढाक्का शहरापर्यंत आगेकूच केली.

पश्चिम आघाडीवर पाकिस्तानचे आक्रमण यशस्वीरीत्या थोपवण्यात आले आणि त्याचबरोबर भारतीय सेनेने ‘शक्करगड’ भागात बराच परिसर पादाक्रान्त केला. पाकिस्तानचे अनेक रणगाडे उद्ध्वस्त केले आणि पाकिस्तानी हवाईदलाचे मोठे नुकसान केले. १६ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानच्या सेनेने ढाक्का येथे शरणागती पत्करली आणि ही लढाई संपली. पूर्व पाकिस्तान एक स्वतंत्र देश झाला, जो आज बांगलादेश या नावाने ओळखला जातो.

या युद्धामध्ये भारताला १९७१च्या भारत–सोव्हिएत रशिया कराराचा फायदा झाला. त्याउलट अमेरिकेने बंगालच्या उपसागरात भारतावर दबाव आणण्यासाठी त्याचे विमानवाहू जहाज युएसएस एंटरप्राईज पाठवून पाकिस्तानला मदत केली.

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

१९७१ च्या युद्धात भारतीय नौसेनेने कराची बंदराविरोधात काय भूमिका निभावली होती ?



१६ डिसेंबर १९७१ : ढाक्का येथे पाकिस्तानची शरणागती

## भारत-पाकिस्तान संघर्ष, कारगिल १९९९




१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात जम्मू काश्मीरमधील राजकीय परिस्थितीत थोडे स्थैर्य होते. १९९८ मध्ये प्रधानमंत्री वाजपेयी यांनी पाकिस्तानचे प्रधानमंत्री नवाझ शरीफ यांची लाहोर येथे भेट घेतली. त्या भेटीद्‌वारे दोन्ही देशांदरम्यान शांतता प्रस्थापित करण्याबाबत चर्चा झाली. याच काळात पाकिस्तानने कारगिलमध्ये अस्थिरता निर्माण करण्याचे कारस्थान रचले.

जोझिला, द्रास, कारगिल आणि बटालिकमार्गे श्रीनगर ते लेह या भारत-पाकिस्तानच्या प्रत्यक्ष ताबारेषेजवळून जाणाऱ्या मार्गावर अडथळा आणण्याचे नियोजन पाकिस्तानने सुरू केले. भारताचा लेहकडे जाणारा मार्ग, तसेच सियाचीनला जाणारा मार्ग या कारवाईमुळे धोक्यात येत होता. नोव्हेंबर १९९८ ते एप्रिल १९९९ या हिवाळ्याच्या काळात पाकिस्तानने तेथील चौक्यांवर ताबा मिळवला. या चौक्या हिवाळ्यातील प्रचंड थंडी व बर्फामुळे मोकळ्या केल्या जात असत.या चौक्या ताब्यात घेण्यासाठी पाकिस्तानने त्यांच्या नॉदर्न लाईट इन्फंट्रीच्या जवानांचा वापर केला. हे लष्करी जवान नसून मुजाहिदिन आहेत असे पाकिस्तान सांगत

होता. या चौक्यांवर पाकिस्तानने ताबा मिळवला आहे हे भारताला मे १९९९ मध्ये तेथे गस्त घालीत असताना समजले. भारताच्या टेहळणी तुकडीला पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेऊन त्यांच्यावर अत्याचार करून मारले.

त्यानंतर भारताने सैन्य पाठवून पहिल्यांदा पाकिस्तानचा हस्तक्षेप रोखला व त्यानंतर त्यांना तेथून हुसकावून लावले. पाकिस्तानवर या कारवाईविरुद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील मोठा दबाव आणला गेला. भारतीय सेनेने शर्थीने पाकिस्तानी घुसखोरांना माघार घेण्यास भाग पाडले. यात भारतीय हवाई दलाचे मोठे योगदान होते. शेवटी २६ जुलै १९९९ रोजी भारताने कारगिलवर विजय मिळवला.

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

श्रीनगर– लेह महामार्गाच्या दृष्टिकोनातून कारगिलचे भूराजकीय महत्त्व काय आहे ?



कारगिल १९९९

**For details of the various wars fought by the Indian Army look at the following website:**

History - The Official Home Page of the Indian Army

https://indianarmy.nic.in/Site/FormTemplete/frmTempSimple.aspx?MnId=+50.




**कारगिल युद्ध स्मारक :** 'ऑपरेशन विजय' या लष्करी कारवाईत हुतात्मा झालेल्या शूर जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ द्रास येथे स्मारक उभारले आहे.

## स्वाध्याय

### प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

**(i)** "रझाकार" हा शब्दप्रयोग ................. यांच्याशी संबंधित आहे.

(अ) हैद्राबादचा निझाम

(ब) जम्मू काश्मीरचे महाराज

(क) बांगलादेशचे मुजीबूर रहमान

(ड) गोव्याचे पोर्तुगीज

**(ii)** जुनागड हे संस्थान .................... या राज्यात होते.

(अ) गुजरात

(ब) गोवा, दमण आणि दीव

(क) महाराष्ट्र

(ड) पश्चिम बंगाल

### (ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.

(i) भारताने कारगिल क्षेत्रात सैन्य पाठवले , कारण.............

### (क) खालील विधानाबाबत योग्य संकल्पना लिहा.

(i) जम्मू-काश्मीर भारताचे अंग बनले त्या दस्तऐवजास संबोधतात.....

### (ड) गटात न बसणारा शब्द शोधा.

(i) छांब, शक्करगढ, अखनुर, अंजदीव

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) युनायटेड नेशन्स ऑब्जरव्हर ग्रुपची निर्मिती १९४७-४९ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर करण्यात आली.

**प्र. ३ खालील विधानावर तुमचे मत लिहा.**

(i) कारगिलसारखी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून भारत काय करू शकतो ?

**प्र. ४ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) १९६१ मध्ये भारताने गोवा कसा ताब्यात घेतला ते स्पष्ट करा.

**उपक्रम**

पूर्व पाकिस्तानच्या नकाशाचा अभ्यास करा. १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध, भारतीय पायदळाने पूर्व पाकिस्तानात कसे लढले ? त्याचे वर्गात वाचन करून त्यावर चर्चा करा.